Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40726)

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL


# IDEAL




Volume - VI, Issue - II
MARATHI
March - August - 2018

IMPACT FACTOR / INDEXING
2017 - 4.988 www.sjifactor.com

AJANTA PRAKASHAN

VOLUME - VI, ISSUE - II - MARCH-AUGUST - 2018
**IDEAL - ISSN 2319 - 359X - IMPACT FACTOR - 4.988** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | भारतातील महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण<br>**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव** | ६२-६५ |
| १५ | भारतीय बॅटमिंटनपट्टू : पी. व्ही. सिंधु<br>**प्रा. डॉ. दिपक नामदेव टेकाडे** | ६६-६८ |
| १६ | विविध विद्याशाखेतील कनिष्ठ महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींच्या सशक्तीकरणाचा तुलनात्मक अभ्यास<br>**श्रीम. कुसुम पारिसा मधाळे** | ६९-७३ |
| १७ | कुस्तीक्षेत्रात महिलांची वाटचाल<br>**भुजबळ दिपक त्र्यंबक** | ७४-७६ |
| १८ | महिला क्रीडापट्टू - पी.टी. उषा<br>**प्रा. चाटे मधुकर शिवाजी** | ७७-७९ |
| १९ | महिला कल्याणासाठीचे कायदेविषयक जाणीव जागृतीचा अभ्यास<br>**प्रा. जयश्री अनिलकुमार शिंदे** | ८०-८४ |
| २० | आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टिंग महिला खेळाडू - करनाम मल्लेश्वरी<br>**प्रा. सुभाष गुणाजी नागरगोजे** | ८५-८७ |
| २१ | महिला सक्षमीकरणासाठी जीवन कौशल्यांचे स्थान<br>**प्रा. देवकर एम. बी.** | ८८-९० |
| २२ | भारतीय बॅटमिंटनपट्टू : मेरी कोम<br>**डॉ. घोंडे सुर्यकांत पांडुरंग** | ९१-९२ |
| २३ | हुंडा विरोधी १९६१ च्या कायद्यातील तरतुदी<br>**प्रा. देवकर एम. बी.**<br>**डॉ. प्रा. इनामदार आर. आय.** | ९३-९५ |

VOLUME - VI, ISSUE - II - MARCH-AUGUST - 2018
IDEAL - ISSN 2319 - 359X - IMPACT FACTOR - 4.988 (www.sjifactor.com)

# १४. भारतातील महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण

प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

भारतीय संस्कृति ही जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. भारतात भौतिक संस्कृतिपेक्षा अभौतिक संस्कृतिला महत्त्व दिले जाते. जगात सर्वच देशात कमी जास्त प्रमाणात लिंगभेदावर आधारित विषमता दिसून येते. भारतात पुरुष प्रधान समाजव्यवस्था आहे. भारतात मोठया प्रमाणात पितृसत्ताक कुटुंब पध्दतीचे अस्तित्व दिसून येते. प्राचीन काळात स्त्रीयांना मानसन्मान दिला जात होता. पण काळाच्या ओघात बदल होत गेले आणि स्त्रीचे कार्यक्षेत्र चुल आणि मुल इतके मर्यादित करण्यात आले. त्याचा परिणाम स्त्रीयांचे परावलंबीत्व वाढत गेले. स्त्रीचा दर्जा समाजात दुय्यम मानण्यात आला. संपत्तीचा वारसदार व वंशाचा दिवा म्हणून मुलाला महत्त्व प्राप्त झाले.

प्रत्येक राष्ट्राची प्रगती व विकास प्रामुख्याने त्या देशातील स्त्री–पुरुष या दोघाचा सक्रिय सहभागावर अवलंबून असतो. मानवी समाजाच्या विकासात महिलांचे योगदान पुरुषापेक्षा कधी ही कमी राहिलेले नाही. पण भारतीय समाजात स्त्रीयांना प्राचीन काळापासून गौण स्थान दिले जाते. एका बाजूला स्त्रीयांची तुलना देवतांचे प्रतिक समजून दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी इत्यादी पुजनीय मानण्यात येते. तर दुसऱ्या बाजूला पुरुशापेक्षा हीन समजून त्यांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात येते.

पण आजच्या घडीला भारतात महिला सक्षमीकरणासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत. तसेच सर्वच क्षेत्रात महिला प्रगती करत आहेत. चुल आणि मुल याच्या पलिकडे जाऊन महिला आज नोकरी–व्यवसाय करुन स्वावलंबी बनत आहेत. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वसा आणि वारसा जतन करुन स्त्रीया शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणात प्रगती करत आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टये**

1) महिला सक्षमीकरणात शिक्षणाची भुमिका अभ्यासणे.
2) आर्थिक घटक व महिला सक्षमीकरण यातील संबंध अभ्यासणे.
3) धर्म आणि महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
4) रुढी, प्रथा, परंपरा व महिला सक्षमीकरण याचा अभ्यास करणे
5) पुरुष प्रधान संस्कृति व महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
6) विविध काळातील स्त्रीयांच्या दर्जाचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य**

1) अज्ञानामुळे महिला सक्षम झाल्या नाहीत.
2) धर्मामुळे महिला सक्षमीकरणात अडथळा निर्माण झाला आहे.
3) आर्थिक घटकाचा महिला सक्षमीकरणाशी काहीही संबंध नाही.

4) महिलावर रुढी, प्रथा, परंपरेचा प्रभाव जास्त असतो.

5) पुरुष प्रधान संस्कृतिमुळे महिला सक्षम झाल्या नाहीत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी प्रामुख्याने वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील महिला सक्षमीकरण**

भारतात स्त्रीचा दर्जा बदल विचार केल्यास असे लक्षात येईल कि प्रत्येक कालखंडात स्त्रीयांचा दर्जा एक सारखा नाही तर त्यात बदल झालेला दिसून येईल.

**विविध कालखंडात स्त्रीयांचा दर्जा**

सिंधू संस्कृतीमध्ये मातृसत्ताक कुटुंब पध्दती होती. कुटुंब प्रमुख म्हणून स्त्रीयांना मानाचे स्थान होते. धार्मिक सण–समारंभात स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीचा अधिकार होता. स्त्रियांना या कालखंडात स्वतःचा विकास करण्यासाठी शिक्षण, विवाह, संपत्ती, वारसा इत्यादी बाबत चांगले अधिकार होते. त्यामुळे या काळातील स्त्रीया सुशिक्षित होत्या.

वैदिक काळात पण स्त्रीयांचा सन्मान केला जायचा. या कालखंडात समाजपुरुश प्रधान होता पण स्त्रीयांना पुरुशाच्या बरोबरीचे स्थान होते. स्त्रीयांना मानसन्मान या काळात पण होता. जीवन उपयोगी शिक्षण त्यांना घेता येत होते. पण उत्तर वैदिक काळात स्त्रीच्या दर्जात घसरण झाली. स्त्रीयांवर अनेक बंधने लादण्यात आली. पुढे प्रारंभिक स्मृतीकाळात तर स्त्रीयांवर अनेक बंधने लादण्यात आली. एकीकडे देवता मानण्यात आले. तर दुसरीकडे स्त्रीयांना कोणतेच अधिकार देण्यात आले नाहीत. त्यानंतर उत्तर स्मृती काळात भारतीय स्त्रीयांचा दर्जा फारच खालावला. तिला गुलामाप्रमाणे वागणूक देण्यात आली. तीचे क्षेत्र चुल आणि मुल इतके मर्यादित झाले. मध्ययुगीन कालखंडात – हा कालखंड मुस्लीम राजवटीचा होता. हा कालखंड स्त्रीयांच्या बाबतीत खूपच वाईट मानला जातो. तिच्यावर खुप बंधने लादण्यात आली. बालविवाह प्रथा, शिक्षणापासून वंचित सती प्रथा, केशवपनाची प्रथा, पडदा पध्दती यासारख्या अनेक वाईट प्रथा मध्ये स्त्रीयांचे जीवन अडकले.

ब्रिटीश कालखंड भारतीय समाजात अस्तित्वात असणाऱ्या बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाह यासारख्या अनेक वाईट प्रथा बंद करण्यावर ब्रिटीशांनी भर दिला. त्यांना अनेक समाज सुधारकांनी सहकार्य केले. अनेक प्रथा बंद करण्यासाठी कायदे करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्त्रीयांच्या विकासाला सुरुवात झाली. अनेक कायदे करण्गात आले. अनेक प्रथा बंद करण्यात आल्या स्त्री शिक्षणावर भर देण्यात आला. भारतीय संविधानाने स्त्री–पुरुष समानता देण्यात आली. स्त्रीयांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. त्यामुळे स्त्री घराबाहेर पडली व अर्थोत्पादनात सहभागी झाली त्यामुळे स्त्रीया स्वावलंबी बनू लागल्या.

**शिक्षण व महिला सक्षमीकरण**

भारतीय समाजात अनेक वर्शापासून स्त्रीयांना शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले होते. त्यामुळे स्त्रीया स्वावलंबी बनु शकल्या नाहीत त्या सक्षम झाल्या नाहीत. पण सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणावा भर दिला. त्यामुळे स्त्रीया शिक्षणाच्या प्रवाहात आल्या त्यामुळे त्या शिक्षण घेऊ लागल्या आज अनेक क्षेत्रात स्त्रीया

आपल्या कार्याचा ठसा उमटवत असताना दिसत आहेत. भारत स्वातंत्र्य झाल्या नंतर अनेक कायदे करण्यात आले मुलीच्या शिक्षणासाठी मोफत एस.टी.पास, मोफत शिक्षण या सारख्या शासनाच्या धोरणामुळे मुलीच्या शिक्षणात मोठया प्रमाणात वाढ झाली व मुली नोकरी व्यवसाय आज करत असताना दिसत आहेत.

**धर्म आणि महिला सक्षमीकरण**

अनेक स्त्रीया आज पण धर्माच्या नावाखाली पुजा, पाठ, उपवास, धार्मिक विधी यात गुंतलेल्या दिसतात याचे कारण स्त्रीयांनी पुजा पाठ करावा. धार्मिक विधीत सहभागी व्हावे अशी समाजाची मानसिकता आहे. धार्मिक विधी करणारी महिला आदर्श मानली जाते. त्यामुळे महिलांना या धार्मिक सण–समारंभात गुंतवल जात त्यामुळे त्या स्वावलंबी बनत नाहीत. परिणामी पुरुषावर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे त्या सक्षम होत नाहीत.

**स्त्रीया व आर्थिक सक्षमीकरण**

स्त्री ही कुटुंबात दिवस रात्र काम करते. पण तिच्या कामाचे मोजमाप करता येत नाही. तिच्या कामाचा तिला मोबदला दिला जात नाही. एवढे करुन ही स्त्री आर्थिक दृष्टया परावलबी असते. शिक्षणाचा अभाव स्वातंत्र्याचा अभाव चुल आणि मुल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र ही समाजाची मानसिकता त्यामुळे स्त्रीयांना उद्योग व्यवसाय करण्यास समाजात पूरक वातावरण नसल्यामुळे स्त्रीया स्वावलंबी होत नाहीत. त्यामुळे स्त्रीयांचे आर्थिक परावलबी वाढत असल्याने स्त्रीया सक्षम होत नाहीत.

**महिला सक्षमीकरण व कुटुंब**

भारतीय संस्कृति पुरुष प्रधान संस्कृति मानली जाते. भारतात पूर्वी मातृसत्ताक कुटुंब पध्दती होती. त्यामुळे कुटुंबात स्त्रीयांना मान सन्मान होता. पण बदलत्या काळात मातृसत्ताक कुटुंब पध्दतीची जागा पितृसत्ताक कुटुब पध्दतीने घेतली आहे. वंश हा पुत्राच्या नावाने चालतो. स्त्रीयांना कुटुंबात मान–सन्मान दिला जात नाही. स्त्रीयाना कुटुबातील निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जात नाही. त्यामुळे तिचे कार्यक्षेत्र चुल आणि मुल एवढया पुरतेच मर्यादित होते. त्यामुळे स्त्रीया आर्थिक बाबतीत परावलंबी बनल्या. त्यांना पुरुशांच्या मर्जीप्रमाणे रहावे लागते. अनेक मुली विवाह झाल्यामुळे शिक्षण सोडतात. त्यामुळे त्या नोकरी करु भाकत नाहीत. स्त्रीयांच्या कुटुंबातील कार्याला दुय्यम मानले जाते.

पण आज काळ बदलत आहे. विवाहीत स्त्रीया पण आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळत व्यवयास नोकरी करीत असताना दिसत आहेत. अनेक स्त्रीयांना कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेतले जात आहे. त्यामुळे महिला सक्षम होत असताना दिसत आहेत.

**महिला सक्षमीकरणात समाज़सुधारकांचे योगदान**

महिला सक्षमीकरणासाठी महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे योगदान महत्वाचे आहे. अनेक लोकांचा विरोध असताना पण मुलींना शिक्षण देण्यासाठी समाजाचा विरोध झुगारुन लावला. व मुलींना शिक्षणाचे दरवाजे खुले करुन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. महाडच्या सत्याग्रहाच्या चळवळी जवळ जवळ पाच हजार स्त्रियांची स्वतंत्र अशी सभा आयोजित केली. ज्या काळात स्त्री घराच्या बाहेर पडत नव्हती. तसेच हिंदु कोड बिलात त्यांनी स्त्रियांना समान हक्क आणि संपत्तीत वाटा मिळायलाच हवा अशी त्यांची आग्रही भुमिका होती.

राज्यघटना तयार करत असताना बाबासाहेबांनी स्त्री पुरुष समानतेचा आग्रह धरला. त्यामुळे आंबेडकरांना स्त्रीयांचा कैवारी मानले जाते.

समाजात असणारी सती प्रथा, राजाराम मोहन रॉय यांना ही क्रूर प्रथा बघवत नव्हती म्हणून त्यांनी त्या विरुध्द आवाज उठविला व समाजात जागृती निर्माण केली. त्यामुळे लॉर्ड बेंटिंग यांनी 1829 साली सती प्रथेवर बंदी घालणारा कायदा केला तसेच अनेक समाजसुधारकानी महिलांना सक्षम करण्यासाठी समाजात असणाऱ्या बालविवाह, केशवपन, विधवा पुर्नविवाह यासारख्या वाईट प्रथाना विरोध केला. त्यामुळे स्त्रीयाना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी कायदे करण्यात आले.

**राजकारण व महिला सक्षमीकरण**

प्राचीन काळापासून स्त्रीया राजकारणात सहभागी घेतात पण ज्यांना संधी मिळाली त्यांनी राजकारणात आपला एक वेगळा ठसा उमटवला. देशाच्या राजकारणात अनेक वर्षापासून महिला दिसतात. पूर्वी ज्या महिला राज्यकारभार करीत असत त्या महिला एकतर पुत्र नाही म्हणून किंवा पतीचे निधन झाले म्हणून राज्य कारभार पाहत असत. पण लोकशाही व्यवस्थेत पतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी,सरोजिनी नायडू, मिरा कुमारी, शिला दिक्षित, सुशमा स्वराज, मायावती वसुधराराजे, ममता बॅनर्जी, यासारख्या अनेक महिलांना देशाच्या राजकारणात एक आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**निष्कर्ष**

भारतीय समाज हा रुढी, प्रथा, परंपरा मानणारा समाज आहे. त्यामुळे स्त्रीयांना चार भितीच्या आत जीवन जगावे लागले. त्यांना कोणत्याही प्रकारचे समाजात स्वातंत्र्य नव्हते. चुल आणि मुल एवढेच त्याचे कार्यक्षेत्र असते अशी मानसिकता त्यांची निर्माण करण्यात आली. आर्थिक दृष्टया परावलंबी असल्यामुळे महिलांचा विकास होऊ शकला नाही.

शासनाने आरक्षण दिल्यामुळे आज स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये महिला सहभागी होत आहेत. त्यामुळे त्यांच्यात नेतृत्व गुणांचा विकास होत आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाला सुरुवात झाली आहे. समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे महिलांना आपला विकास करुन घेण्याची संधी मिळाली. अनेक जाचक रुढी, प्रथा, परंपरा पासून स्त्रीयांना मुक्ती मिळाली आहे. त्यामुळे महिला सक्षम होत असतांना दिसत आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

1) ज.भां आपटे पुष्पा रोडे – भारतातील महिला विकासाची वाटचाल – डायमंड प्रकाशन, पुणे
2) साने गीता – भारतीय स्त्री जीवन – मौज प्रकाशन, मुंबई
3) विद्युत भागवत – स्त्री प्रश्नांची वाटचाल
4) योजना मासिक – नोव्हेंबर 2009
5) सामाजिक संशोधन पध्दती – प्रदिप आगलावे – साईनाथ प्रकाशन – नागपूर.
6) इंटरनेट.